HGH INDIA 2016 SM
Homedécor ▪▪▪ Gifts ▪▪▪ Houseware
JULY 1-3, 2016 MUMBAI, INDIA

# NEWS 1

A TEXZONE Event

**Where business feels at home!**

पाचवी आवृत्ती

# अधिक प्रदर्शक नवीन संधी

## ३० देशांमधील १०० नवीन प्रदर्शक. मोठे भारतीय ब्रँड्स नवीन उत्पादनांचे अनावरण करणार




आपल्या स्थापनेपासून पाच वर्षांच्या कालावधीत एचजीएच इंडिया होम टेक्स्टाइल्स, होम डेकॉर, हाऊसवेअर आणि भेटवस्तू यांचा भारत आणि इतर देशांमधील भारतीय व्यापारी ग्राहक आणि विक्रेते यांच्यासाठी एक विश्वासू ट्रेड शो म्हणून उगवला आहे. भारतीय आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शक तसेच नवीन भेटकर्त्यांकडून मागीलवर्षी दुपटीपेक्षा चौकशा आल्या असल्यामुळे व्यापार, ब्रँड, उद्योग आणि आयातदार यांच्यासाठी ट्रेड शोच्या उपयोगाचा हा पुरावाच ठरला आहे.

एचजीएच इंडिया २०१६ ही वार्षिक ट्रेड शोची पाचवी आवृत्ती असून त्याचे आयोजन १-३ जुलै २०१६ दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई, भारत येथे केले जाणार आहे. या शोच्या तारखेच्या दोन महिने आधी एचजीएच इंडीया २०१६ ही ट्रेड शोची सर्वांत मोठी आवृत्ती असेल कारण यात ४५० पेक्षा अधिक उत्पादक आणि सुमारे ३० देशांमधील ब्रँड्स डिस्प्लेवर असणार आहेत. अनेक नवीन भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्मनी, इटली, फ्रान्स, बेल्जियम, ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, तुर्कस्तान, चीन, हाँगकाँग, जपान, कोरिया, तैवान, थायलंड, मलेशिया, व्हिएतनाम, बांग्लादेश इत्यादी देशांमधील प्रदर्शक यात सहभागी होऊन भारतीय बाजारपेठेला आधुनिक जीवनशैलीच्या अनेक नवीन उत्पादनांच्या संकल्पना प्रथमच दाखवतील.

याशिवाय, नियमित प्रदर्शकांपैकी ८० टक्के या वर्षी पुन्हा एकदा प्रदर्शनात सहभागी होणार आहेत आणि ते आपले नवनवीन शोध आणि कलेक्शन एचजीएच इंडिया २०१६ मध्ये दाखवतील. अनेक नवीन भारतीय आणि आंतरराष्ट्रीय उत्पादन विभाग आणि पुरवठादारही या वेळी प्रथमच दिसणार आहेत. ते आपली भेट रिटेलर्स, वितरक आणि संस्थात्मक खरेदीदारांसाठी आणखी जास्त आकर्षक बनवणार आहेत.

व्यापारी भेटकर्ते ज्यात भारतीय रिटेलर्स, आयातदार, होलसेलर्स, वितरक, वास्तुविशारद आणि भारतभरातील ४२५ पेक्षा अधिक शहरे आणि गावांमधील संस्थात्मक खरेदीदार या वेळी भेट देण्याची अपेक्षा आहे. सध्याचे वाढते स्वारस्य पाहता, भेटकर्त्यांची संख्या मागील वर्षाच्या २२,७५० वरून सुमारे २५ टक्क्यांवर जाण्याची अपेक्षा आहे.

वेगाने वाढणाऱ्या भारतीय होम फॅशन मार्केटसाठी खासकरून डिझाइन करण्यात आलेला हा शो भारतातील संभाव्य बिझनेस भागीदारांना सुमारे ३० देशांमधील प्रदर्शकांशी एका लक्ष्याधारिक बिझनेस वातावरणात जोडणार आहे.

एचजीएच इंडियाचे प्राथमिक उद्दिष्ट हे भारतीय डिपार्टमेंट स्टोअर्स, हायपर मार्केट्स, इ-रिटेलर्स, स्पेशालिटी रिटेलर्स, फ्रँचायझीज, बुटिक्स, आयातदार, होलसेलर्स, वितरक, संस्थात्मक ग्राहक आणि संभाव्य बिझनेस भागीदारांना भारतीय आणि आंतरराष्ट्रीय उत्पादक, ब्रँड्स, आयातदार, निर्यातदार आणि वितरक यांच्याशी जोडून स्त्रोत निर्माण करण्याचे आहे.

एचजीएच इंडियामधून भेटकर्त्यांना २०१६/१७ साठी आगामी फॅशन ट्रेंड्स आणि बाजारातील ट्रेंड्स ओळखणेही शक्य होईल. कॉग्निझन्स (अनुभूति) या नावाच्या ट्रेंड्स पॅव्हिलियनला ज्या कुणाला गांभीर्याने पुढील रिटेल हंगामात सोर्सिंग करायची आहे अशा लोकांनी भेट द्यावीच असे ते आहे.

या ट्रेड शोमुळे प्रदर्शकांना त्यांचे नवनवीन शोध आणि नवीन कलेक्शन एकाचवेळी आपल्या विद्यमान आणि संभाव्य ग्राहकांना आणि भारतातील व्यापाऱ्यांना दाखवणे शक्य होणार आहे.

२०१२ मधील आपल्या पहिल्या वर्षापासून एचजीएच इंडियाकडून दरवर्षी ९० टक्क्यांपेक्षा अधिक प्रदर्शक आणि भेटकर्त्यांना आकर्षित केले जाते आणि त्यामुळे विक्रेते आणि ग्राहक या दोघांसाठीही एक उत्तम व्यासपीठ म्हणून त्याची ताकद दाखवणे शक्य होते.

चार यशस्वी वार्षिक आवृत्त्या झाल्यानंतर एचजीएच इंडियाने आता स्वतःला एक जागतिक दर्जाचे, व्यावसायिक, प्रवाह निश्चित करणारे आणि परिणाम सुसंगत ट्रेड शो म्हणून प्रस्थापित केले आहे. भारतीय व्यापारी आणि संस्थात्मक ग्राहकांसाठी सोर्सिंगच्या हंगामाच्या सुरूवातीला आयोजित करण्यात आलेल्या एचजीएच इंडियाने आपले प्रदर्शक आणि भेटकर्ते यांची वाढ आणि दर्जा सातत्यपूर्ण ठेवला आहे.




**नवनवीन शोध ▪ प्रवाह ▪ उत्पादने ▪ स्त्रोत ▪ संधी**

# एचजीएच इंडिया २०१६: ४५० ब्रँड्स आणि उत्पादकांकडून स्त्रोत

## भारतीय बाजारपेठ

वेगाने प्रगती करणारे, तरूण आणि महत्त्वाकांक्षी ग्राहक ज्यांचे उत्पन्न वार्षिक ७-९ टक्क्यांनी वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत वाढू लागले आहे, अशांसाठी जागतिक तसेच भारतीय बाजारपेठेतील संधी कधीही संपुष्टात येणार नाही.

एकूणात भारतात गृहोपयोगी उत्पादनांची मागणी वार्षिक २०-२५ टक्क्यांनी वाढू लागली आहे. या अंतर्गत घरगुती टेक्स्टाइल्स, ब्लाइंड्स, फ्लोअर कव्हरिंग आणि वॉल पेपर्स यांची मागणी २० ते ३० टक्क्यांनी वाढू लागली आहे, घरगुती वस्तूंची मागणी १५ ते २० टक्क्यांनी आणि भेटवस्तूंची मागणी वार्षिक १० ते १५ टक्क्यांनी वाढू लागली आहे.

या मोठ्या आणि तरीही वैविध्यपूर्ण बाजारपेठेत विश्वासू आणि शाश्वत उद्योग भागीदारांशी जोडले जाणे हे भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्स आणि उत्पादकांसमोर असलेले मोठे आव्हान आहे. एचजीएच इंडियाकडून गृहोपयोगी टेक्स्टाइल्स, फर्निशिंग्स, होम डेकॉर, हाऊसवेअर आणि भेटवस्तू इत्यादी वर्गांमध्ये या प्रश्नावर उपाय शोधले जात आहेत. या ट्रेड शोमधून त्यांच्या प्रदर्शकांना भारतातील प्रस्थापित रिटेलर्स, आयातदार, वितरक, होलसेलर आणि एजंट यांच्यामधील सर्वोच्च स्त्रोत निर्णयकर्त्यांसोबत जोडणे शक्य होते.

येत्या १-३ जुलै २०१६ दरम्यान आयोजित एचजीएच इंडिया २०१६ बाबत अधिक माहिती www.hghindia.com वर मिळू शकेल.











## एचजीएच इंडिया २०१५ मधून आलेले चांगले परिणाम

एचजीएच इंडिया २०१५ मध्ये अनेक उच्च ब्रँड आणि उत्पादन अनावरणे, व्यापार योजना आणि नवीन मोहिमा होत्या. या दरम्यान अनेक उत्तम दर्जाची उत्पादने, शेकडो नवीन डिझाइन्स आणि उत्पादने नावीन्यपूर्ण वैशिष्ट्यांसह विविध प्रदर्शकांनी अनावरित केली होती. ट्रायडंट ग्रुपकडून एक मोठे अनावरण, सेलिब्रिटी शेफ संजीव कपूर यांच्याकडून अनावरण, डिसिटेक्स फर्निशिंगकडून नवीन बेड लिनेन लाइन आणि विविध प्रकारच्या नवीन आणि नावीन्यपूर्ण कलेक्शन्सचे अनावरण प्रदर्शकांनी केले आणि त्यामुळे मागील आवृत्तीच्या तीनही दिवसांमध्ये उत्साह कायम राहिला.

एकूण २८ देशांमधील उत्पादने प्रदर्शनात मांडण्यात आली. जर्मनीतील **इवेसेल** ग्लासवेअरसारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँडचा सहभाग, स्पॅनिश ब्रँड **जुयपाल** यांच्याकडून साठवणूक स्वच्छता श्रेणी आणि इटालियन ब्रँड **रोसेटीकडून** कुकवेअर आणि कटलरी तसेच **हर्लेक्विन, कासमान्क, डिझायनर्स गिल्ड, झिमर+ रोहद, फॉरेस्ट, नाच्तमान** आणि इतर अनेकांनी या शोच्या आकर्षकतेत भर घातली. **चीनमधील २५ पेक्षा अधिक प्रदर्शकांनीही** या शोमध्ये भारतात प्रवेश केला.

नवीन उत्पादने, डिझाइन नावीन्यपूर्णता आणि गृहोपयोगी उत्पादनांच्या विद्यमान तसेच नवीन उप विभागांमध्ये व्यापक श्रेणी **भारत, इटली, जर्मनी, स्पेन, बेल्जियम, फ्रान्स, ब्रिटन, झेक रिपब्लिक, यूएसए, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, चीन, तैवान, कोरिया, थायलंड, रशिया, जॉर्डन, तुर्कस्तान, हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती** आणि इतर देशांमधील नियमित आणि नवीन प्रदर्शकांकडून दाखवण्यात आली.

## होम टेक्स्टाइल्स असोसिएशन ऑफ इंडिया



एचजीएच इंडिया २०१५ ला होम टेक्स्टाइल्स असोसिएशन ऑफ इंडियाकडून पूर्णपणे सहकार्य मिळाले आहे. ही होम टेक्स्टाइल्स आणि फर्निशिंग रिटेलर्सची भारतातील सर्वाधिक प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे. या ट्रेड शोमध्ये असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीचेही आयोजन करण्यात आले होते.

**होम टेक्स्टाइल्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष जगदीश खंडेलवाल** म्हणाले की, ''एचटीए आपल्या सदस्यांच्या सर्वसाधारण कल्याण आणि बिझनेस प्रमोशनसाठीच्या सर्व योजना आणि कार्यक्रमांना पाठिंबा देणार असून आम्ही 'मेड इन इंडियावरील' लक्ष केंद्रित केल्यामुळे आम्हाला आमच्या देशांतर्गत ग्राहकांना आमची उत्पादने दाखवायची आहेत. तसेच आमची उत्पादने जगातील सर्वोत्तम उत्पादनांच्या पातळीची आहेत. एचजीएच इंडिया टीमला एक असे व्यासपीठ निर्माण करण्यासाठी श्रेय मिळते ज्यात भारतात विक्री करू इच्छिणारे उत्पादक आणि ज्या रिटेलर व्यापाऱ्यांना येथून उत्पादने न्यायची आहेत त्यांना एकाच छताखाली व्यावसायिक वातावरणात भेटून बिझनेसमध्ये उलाढाल करता येईल.''





# होम टेक्स्टाइल्स, होम डेकॉर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूंचा आराखडा


## भेट देणाऱ्यांचे अभिप्राय



**विक्रम चिटणीस**

*होम स्टॉप, मुंबई*

या वर्षी एचजीएच इंडिया शो हा जास्त वैविध्यपूर्ण झाला असून उत्पादनांच्या वर्गवारीबाबत अधिक चांगला झाला आहे. प्रकाशयोजना आणि सेवा दर्जाही सुधारला आहे. पहिल्याच दिवशी मला तो खूप आवडला. तो एकूणच सकारात्मक वाटला.



**कृती सनोन**

*ब्रँड ॲम्बेसेडर– ट्रायडंट ग्रुप*

मी इथे आले तेव्हा मला पूर्णपणे नवीन अनुभव वाटला. येथील लोक, तुम्हाला दिली जात असलेली जागा हे सर्व काही खूप छान आहे. अगदी तुम्ही जेव्हा चालत असता तेव्हाही तुम्हाला खूप लोक आणि खूप सारे ब्रँड्स आजूबाजूला पाहायला मिळतात. हा माझ्यासाठी एक पूर्णपणे वेगळा आणि नवीन अनुभव आहे. यासारखे कार्यक्रम आणि ब्रँड अनावरण सामान्यतः होत नाहीत परंतु हे अनावरणासाठी एक उत्तम ठिकाण आहे असे मला वाटते कारण हीच बाजारपेठ आहे, इथे या प्रकारच्या ब्रँड्ससाठी आणि या प्रकारच्या होम डेकॉरसाठी लोक येतात.



**दिलीप गांधी**

*संचालक– भारत फर्निशिंग*

मागील आवृत्तींच्या तुलनेत यावर्षी हे बूथ आकार, सहभागी तसेच डेकोरेशनच्या बाबतीत खूप वेगळे वाटले. एचजीएच इंडियामध्ये आम्ही अनेक उत्पादकांना भेटलो ज्यांना आम्ही यापूर्वी भेटलो नव्हतो. आता आम्हाला या शोमध्ये दरवर्षी अनेक नवीन उत्पादकांना भेटण्याची संधी मिळेल. येथे सर्व उत्पादक नवनवीन उत्पादने प्रदर्शित करतात. आम्हाला ती पाहून मागणीही नोंदवता येते. एवढ्या उत्पादकांना एकाच ठिकाणी भेटता येण्याचा हा एक फायदा असल्याचे आम्हाला वाटते.

**भानू उपाध्याय**

*वॉलमार्ट इंडिया, दिल्ली एनसीआर*

आम्हाला ज्या प्रकारची विविध उत्पादने आणि वर्गवारी घ्यायची होती त्याचा एक मोठा भाग एचजीएच इंडियामध्ये उपलब्ध आहे. आम्हाला या शोशी भविष्यात एका चांगल्या पद्धतीने जोडून घ्यायला निश्चितच आवडेल.



**हिरू ठाकूरदास**

*मुख्य कार्यकारी अधिकारी*
*– होम आणि फूटवेअर, फ्युचर ग्रुप*

चार वर्षांपासून मी एचजीएच इंडियाला भेट देत आहे आणि दरवर्षी मला वर्गवारी, उत्पादने आणि आकार यांच्याबाबत प्रचंड प्रगती आणि बदल झाल्याचे आढळते. अशा प्रकारचे नवीन व्हेंडर्स, नवीन प्रदर्शक, नवीन वर्गवारी, हे सर्वकाही तर आहेच पण त्याचबरोबर नवीन फ्लोअरिंग, स्वयंपाकघर, हाऊसवेअर, बेडिंगचे नवीन व्हेंडर्सही मला दिसले आणि त्याचे संयोजन मागील वर्षाच्या तुलनेत खूप चांगले झाले आहे.



**हंस उदेशी**

*मॅक्स हायपरमार्केट इंडिया, बंगळुरू*

मी यापूर्वी एचजीएच इंडियाला भेट दिली आहे. आपल्याला पाहायला मिळत असलेल्या वर्गवारीचे एक्स्पोजर आंतरराष्ट्रीय पातळीचे आहे. मी मान्य करायलाच हवे की, हा शो वर्षागणिक मोठा होत चालला आहे. एचजीएच इंडिया हा मोठ्या प्रमाणावरील व्हरायटी आणि विविध प्रकारची उत्पादने एकाच ठिकाणी मिळवण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

## प्रदर्शकांचा अभिप्राय



**झेंग डी, सिसेट**

*वाणिज्य मंत्रालय, चीन*

आम्ही अमेरिका आणि युरोपमध्ये सहभागी झालेल्या अनेक आंतरराष्ट्रीय ट्रेड शोच्या तुलनेत हा शो खूप जास्त व्यावसायिकरित्या आयोजित करण्यात आला आहे. आमच्या प्रदर्शकांकडे पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणावर लोकांनी भेट दिली. आम्ही भारतात प्रथमच प्रदर्शनात सहभागी झालो आहोत आणि आम्हाला मिळालेला प्रतिसाद आमच्या अपेक्षेपेक्षा खूप जास्त आहे.

**विचाई पूसित्रनुसर्न**

*व्यवस्थापकीय संचालक– डीकेडब्ल्यू, थायलंड*

आम्हाला एचजीएच इंडियाकडून मिळालेला प्रतिसाद अधिकाधिक चांगला होऊ लागला आहे. आम्हाला भारतीय बाजारपेठेत असलेल्या संधी पाहून खूप आनंद होत असून येथे आम्ही जास्तीत जास्त मिळवण्यासाठी येऊ. या वर्षी हे प्रदर्शन जास्त चांगल्या रितीने आयोजित करण्यात आलेले असून ते मोठे झाले आहे. आम्हाला आणखी ग्राहक मिळू लागले आहेत.

**जुएन जोस वेलोर**

*जुयपालहोगर एसएल स्पेन*

आम्ही भारतात प्रथमच सहभागी होत असलेला हा एक चांगला शो आहे. या वेळी भेटकर्त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर चौकशा केल्या. या शोनंतर जास्त चांगल्या पद्धतीने संवाद साधण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

**डायसुक किडोकोरो**

*विक्री व्यवस्थापकः तोसो, जपान*

एचजीएच इंडियामध्ये आमच्या उत्पादनांमध्ये स्वारस्य असलेल्या अनेक भारतीय ग्राहकांना भेटलो. आमचा ब्रँड आणि उत्पादने यांचा भारतीय बाजारपेठेत विस्तार करण्यासाठी एक उत्तम संधी म्हणून मी स्वतः याकडे पाहतो.



**अनिश दोशी**

*टेक्स्ट्रेड इंटरनॅशनल लि.*

''आम्ही यापूर्वी निर्यातीच्या क्षेत्रात होतो. मी मागील वर्षी एचजीएच इंडियाला भेट दिली आणि देशांतर्गत बाजारपेठेचा विस्तार करण्यासाठी मला त्यातून प्रेरणा मिळाली. त्यामुळे मी या शोमध्ये प्रदर्शन करण्याचा निर्णय घेतला आणि त्याला मिळणारा प्रतिसाद खूप मोठा आहे.''

या वर्षी आम्ही सुरुवातीच्या अनुभवांवर आधारित राहून अभ्यास करू आणि आमची जागतिक दर्जाची उत्पादने आमच्या भारतीय रिटेलर्सना देऊ.



**निमिष अरोरा**

*व्यवस्थापकीय संचालक*
*डिसिटेक्स फर्निशिंग्स लि.*

एचजीएच इंडियाने आम्हाला देशभरात आमचा व्यवसाय वाढवण्याची संधी दिली आहे. एचजीएच इंडिया २०१६ या आगामी शोमध्ये आम्ही अनेक नवनवीन शोध आणि नवनवीन उत्पादने आणणार आहोत. जसे खास इटालियन वॉलपेपर्स आणि फॉइल प्रिंटेड फर्निशिंग कापडाची श्रेणी. आमच्या डीलर्सना आमच्या बेड लिनेनच्या कलेक्शनमध्येही अधिक नवनवीन प्रकार मिळू शकतील.



**रजनीश भाटिया**

*बिझनेस प्रमुख (देशांतर्गत)*
*ट्रायडंट ग्रुप*

''ट्रायडंट ही टेरी टॉवेल्समधील एक प्रस्थापित जागतिक स्तरावरील कंपनी आहे. आम्ही सर्व विभागांना सेवा देणाऱ्या होम टेक्स्टाइल्सच्या संपूर्ण श्रेणीसह भारतीय देशांतर्गत बाजारपेठेत सहभागी होण्याचा निर्णय मागील वर्षी घेतला. आम्हाला हे करण्यासाठी एचजीएच इंडिया इतके दुसरे चांगले व्यासपीठ असेल असे वाटत नाही.''

आगामी प्रदर्शनात आम्ही अनेक आकर्षक नवीन उत्पादनांचे अनावरण करण्यासाठी उत्सुक आहोत ज्यातून या उद्योगाला ट्रायडंटकडून आपल्या ग्राहकांसाठी विविध प्रकारची उत्पादने मिळू शकतील.



**संजीव कपूर**

*व्यवस्थापकीय संचालक*
*खानाखजाना प्रा.लि.*

मला हे सांगताना खूप आनंद होत आहे की, एचजीएच इंडियाने अत्यंत कमी कालावधीत उद्योगासाठी केवळ भेट देण्याच्या दृष्टीने नाही तर विचारांच्या दृष्टीने अत्यंत आंतरराष्ट्रीय असलेला एक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी एक वातावरण आणि व्यासपीठ निर्माण केले आहे. एचजीएच इंडियामधील सुविधांचा दर्जा आणि स्थान तुम्हाला परदेशी गेल्यावर पाहायला मिळतात. मला आनंद वाटतो की केवळ संजीव कपूर ब्रँड नाही तर वंडरशेफ आणि फूडफूड हे आमचे टीव्ही चॅनल्ही एचजीएच इंडियाशी जोडले गेले आहेत. ही भागीदारी यापुढील काळात वाढत जाणार आहे.




**दीपाली गोएंका**

*व्यवस्थापकीय संचालक, वेलस्पन रिटेल*

व्यापारातील आमच्या नवीन श्रेणीचे एक मोठे अनावरण एचजीएच इंडिया २०१६ च्या माध्यमातून करण्यासाठी आम्ही उत्सुक असून आम्हाला आत्मविश्वास वाटतो की, रिटेलर्सना हे त्यांच्या बिझनेससाठी खूप फायदेशीर ठरेल.


मला एचजीएच इंडियामध्ये येणाऱ्या लोकांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक वाढल्याचे दिसून आले आहे. आपल्या देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न ७.५ ते ८ टक्क्यांनी वाढू लागले असताना भारतीय बाजारपेठ वेगाने वाढेल. भारतात स्पेसेस, वेलस्पन ब्रँडला प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर वाढू लागला आहे. मागील वर्षी आम्ही सुमारे ३५ टक्क्यांनी वाढलो. या वर्षी आम्हाला ६५ टक्क्यांची निश्चित वाढ मिळेल याची खात्री आहे. भारतीय बाजारपेठ किती वेगाने वाढून बदलते आहे याची कल्पना तुम्ही करू शकता. एचजीएच इंडिया या वाढीत योगदान देत आहे.



**विजय अग्रवाल**

*अध्यक्ष, क्रिएटिव्ह पोर्टिको*

एचजीएच इंडिया ही माझ्या मते काळाची गरज आहे. मला आज येथे जे काही पाहायला मिळाले त्यामुळे मी खूप आनंदित झालो आहे. होम फॅशन म्हणजे काय आणि तुमचे घर कसे सुंदर होईल याची माहिती लोकांना होणे गरजेचे आहे असे मला वाटते. तुम्ही काय घालता याचबरोबर तुमचे घरही तितकेच महत्त्वाचे आहे. एचजीएचने ती भूमिका पार पाडली आहे. भविष्यातही ते हेच कार्य उत्तमरित्या करतील असे मला वाटते. हा खऱ्या अर्थाने एक मोठा शो आहे असे मला वाटते.





**कुलदीप वात्तल**

*अध्यक्ष– सीईपीसी*

पुढील काही वर्षांमध्ये हा शो होम टेक्स्टाइल्स आणि कारपेट विभागात भारतातील सर्वांत मोठ्या शोपैकी एक ठरेल. कारपेट एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलचा विचार करता, मी या शोसाठी येत असल्याची ही पहिलीच वेळ आहे पण माझे सहभागी मागील काही वर्षांमध्ये वाढले आहेत. ते आगामी काळातही मोठ्या प्रमाणावर या शो चा भाग होण्यासाठी तयार आहेत.

**१–३ जुलै, २०१६, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव (पूर्व), मुंबई.**















# Visitor
## Registration Form

HGH INDIA 2016 — Homedécor ■■■ Gifts ■■■ Houseware — Redefining Sourcing

☐ Mr. ☐ Ms. ☐ Mrs.

Name____________________

Designation____________________

Company____________________

Address____________________

City__________ Pin Code __________ State __________

Telephone (Off.)__________ Fax __________

Mob 1__________ Mob 2 __________

Email 1__________ Email 2 __________

Website____________________

### A. Type(s) of your Business (Please tick ☑)

**Retailer**
☐ Department Store ☐ Traditional Store
☐ Mail Order House ☐ Boutique
☐ Hyper Market ☐ Cash and Carry
☐ Discount Store ☐ Other________
☐ Speciality Stores(MBOs) ________
☐ Speciality Stores(EBOs) ________

**Trade Representative**
☐ Sales Agent
☐ Brand Representative
☐ Distributor
☐ Importer
☐ Wholesaler

**Buyers**
☐ Interior Designer
☐ Corporate Gifts
☐ Gift Suppliers
☐ Buying Houses

**E-Commerce**
☐ Online Retailers ☐ Other________
☐ TV Shopping ________
☐ Mail Order

**Industry**
☐ Manufacturer
☐ Brand Owner
☐ Exporter

**Others**
☐ Service Provider
☐ Trade Association
☐ Government

### B. Products of your interest

**Home Décor**
☐ Ceiling ☐ Floor
☐ Wall ☐ Decorative Accessories
☐ Windows ☐ Lifestyle

**Home Textiles**
☐ Sleeping ☐ Living
☐ Bath ☐ Furnishing
☐ Table & Kitchen

**Gifts**
☐ Corporate
☐ Personal
☐ Festive

**Houseware**
☐ Cookware ☐ Maintenance
☐ Kitchen Appliances ☐ Cleaning
☐ Tableware ☐ Storage
☐ Bathroom ☐ Outdoor

**Services**
☐ Trade Publication ☐ Visual Merchandising
☐ Institutional ☐ IT Solutions
☐ Retail Management ☐ Other Support Services(Specify)
☐ Logistic ________

### C. Purpose of your visit

☐ Source International Products ☐ Source Indian Products ☐ Find New Suppliers
☐ Meet Current Suppliers ☐ Find Agent / Distributor ☐ New Business Opportunities
☐ Product Innovations/Trends ☐ Market Information
☐ Other (Please Specify)________

### D. How did you learn about this Trade Show?

☐ Internet ☐ Email ☐ Website ☐ Direct Mailer ☐ Newspaper
☐ Hoardings ☐ Advertisements ☐ From Exhibitor ☐ From Organiser ☐ Word of Mouth
☐ Other(Please Specify)________

### E. Have you visited any previous edition of HGH India?

☐ HGH India 2013 ☐ HGH India 2014 ☐ HGH India 2015 ☐ All Editions ☐ None

*Important notes:*
*1) Incomplete form in any respect will not be accepted. It is mandatory to fill the column Invited by.*
*2) HGH India is strictly a Trade Show. Therefore entry to consumers is not allowed. No retail purchase permitted.*
*You can be disqualified if found doing retail purchases. 3) Children below 15 years are not allowed*

Duly filled form to be sent by Fax: +91-22-2421 4116 or Email: visitors@hghindia.com or by post latest by 10th June, 2016 to the address mentioned below. You can also register online at www.hghindia.com>visitors>visitor registration

**आयोजक: टेक्सझोन इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस प्रा. लि.**
४३१, कलिंन्दास उद्योग भवन, सेंच्युरी भवनजवळ, प्रभादेवी, मुंबई– ४०००२५.
दूरध्वनी: +९१ (२२) २४२१४१११. फॅक्स: +९१ (२२) २४२१४११६. इमेल: exhibitors@hghindia.com.
**दिल्ली कार्यालय:** युनिट क्रमांक १००३, विक्रांत टॉवर, राजेंद्र प्लेस, नवी दिल्ली– ११०००८.
दूरध्वनी: +९१ (११) २५७१ ४१११. फॅक्स: +९१ (११) २५७१४११६. इमेल: exhibitors@hghindia.com

**प्रदर्शकांसाठी संपर्क**
भारत: मुकेश अग्रवाल, कार्यालय: +९१ (२२) २४२१४१११. मोबाइल: +९१ ९८२१३ १०४५३.
इमेल: mukesh.agarwal@hghindia.com
**युरोप:** पिया रायसेन, एक्स्पो आणि कन्सल्टिंग असोसिएट्स, ॲमस्टरडॅम.४४, डीई– ४०४७४. ड्युसेलडॉर्फ, जर्मनी,
दूरध्वनी: +४९ २ ११६५४९४५३. फॅक्स: +४९ २ ११ ६५४९४५६ इमेल: pia.rhysen@expoandconsulting.com

**भारतासाठी अभ्यागत संपर्क**
श्री. अमर शर्मा, मोबाइलछ +९१ ९९६७६००२८६ कार्यालय: +९१ (२२) २४२१ ४१११ इमेल: visitors@hghindia.com
श्रीमती विद्या वर्धमान. मोबाइल: +९१ ९९६७६००५७६ कार्यालय: +९१ (२२) २४२१ ११. इमेल: visitors@hghindia.com